# राशिभविष्य - डिसेंबर, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==================================================

**(१) मेष -** या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत मंगळ असून तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार आहे. हा मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अकारण श्रम, दगदग होणे संभवते. त्याच्यामुळे महिन्याचा अखेरचा सप्ताह या राशीच्या नोकरदार मंडळींना मनस्तापदायक जाण्याची शक्यता आहे. वाद, भांडणे होणे, मानहानी होणे, त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. या प्रथम स्थानी वक्री हर्षल आहेच. या हर्षलमुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असण्याची शक्यता आहे. तसेच कोणाचा धाक किंवा दडपण सहन होत नसेल. या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर, खट्याळ झाली असण्याची शक्यता वाटते. पण हा हर्षल उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात कलह होतील व आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. जीवनसाथी/संगिनी कलाकार असेल तर सुखात भरच पडेल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. तेव्हा त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींना फारसे श्रम न करता अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण हा शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या वृद्धांनी विशेष काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी रवि -बुध- केतू आहेतच. या केतूमुळे महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनातील सुखात व

कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. त्याशिवाय हा केतू अपघातकारक तसेच अनारोग्यकारक होणार आहे. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, काही मंडळींना मुख-दंत रोग तर काही मंडळींना रक्तविकाराचा आजार होणे संभवते. या संपूर्ण महिन्याच्या काळात रवि ग्रह प्रतिकुल होणार असून बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व सुखकारक होईल व त्यामुळे कार्यसिद्धी होऊन यश मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे वाद, भांडणे, नियोजित कामात अडचणी, अडथळे निर्माण होतील. रवि ग्रहामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, दु:ख, अनारोग्य, मानहानी होणे संभवते. शिवाय संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो लोखंड, पोलाद, कोळसा यांचा व्यापार, व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनी कुमाराभ्यां नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः: " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ** - या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत अपमान होणे संभवते. त्यामुळे मनात सूडभावना निर्माण होईल. परिणाम म्हणून या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे मनात शुद्ध प्रेमभावना निर्माण न होता त्यात कामुकता असण्याची शक्यता आहे. त्याशिवाय काही मंडळींना उच्च कलागुण असूनही ते लोकांसमोर प्रकट करण्याची संधीच मिळणार नाही. त्यामुळे काही जण व्यसनाधीन होण्याची शक्यता आहे. तसेच नको ते आळ येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत रवि - बुध - केतू असून रविमुळे अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे. बुधामुळे दु:ख, भांडणे होणे संभवते. हा बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे.

सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. मनस्थिती अस्थिर राहील व हाती घेतलेल्या कामात अपयश येईल. या महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेलेल्या रवि -बुधापैकी रवि ग्रह प्रतिकुल होणार असून बुध ग्रह अनुकुल होईल. येथील रविमुळे दु:ख,अपयश, अनारोग्य होणे संभवते. इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. संततिसुखात बाधा येईल. मानहानी होईल. पण बुधामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील. पण हा नेपच्यून मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कष्ट परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण येथील मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या व्ययस्थानी मेष या स्वराशीत गेल्यावर थोडा फार अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे मानहानी, अस्वस्थ मनस्थिती, चिंता, भांडणे यांमुळे अस्वस्थ व्हाल. याच व्ययस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना वाईट प्रसंगाला तर काहींना जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. काही मंडळींवर बेअब्रूचे प्रसंग ओढवण्याची शक्यता आहे. सांपत्तिक अडचणी येतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. शिवाय रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून या शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी जात आहे. त्या काळात या कलाकारांना उच्च कलागुण असूनही ते व्यक्त करण्याची संधीच मिळणार नाही. या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत रवि -बुध - केतु असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि दशम या नोकरी-व्यवसायाच्या स्थानास पूरक होईल. पण बुध ग्रह प्रति- कुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, दु:ख होणे संभवते. केतू अनुकूल असून त्याच्यामुळे आरोग्य, उच्च गुण प्राप्त होतील व सर्व सुखसमाधान लाभेल. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम

स्थानी धनु राशीत जात आहेत. या स्थानी आलेला रवि ग्रह अनारोग्यकारक होईल व त्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुधामुळे वाद, भांडणे, दु:ख यांमुळे त्रस्त व्हाल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे असमाधानकारक घटना घडतील. मनस्थिती अशांत राहील. क्वचित कोणास एखादा मोठा आजार होणेही संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो शुभ आहे. त्याच्यामुळे अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, खळबळजनक घटना घडतील. पण औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जात आहे. त्या काळात कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल. हितशत्रूंपासून रक्षण होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम आदितीये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. ऐषाराम, सुखशांती लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत रवि -बुध -केतू असून महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. येथील रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असणार असून त्यांच्यामुळे नोकरीत वरिष्ठांचा त्रास, अस्वस्थ मनस्थिती, संततिसुखात बाधा, प्रियजनांपासून दूरत्व, अनारोग्य, अपचन यांचा त्रास होणे संभवते. केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधा येईल. काही मंडळींना पोटविकाराचा त्रास होणे संभवते. पण हा केतु उपासना, गूढ अभ्यास यांची आवड असणारांना अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र या पंचम स्थानी आल्यावर सर्व प्रकारच्या कलाकारांना कलेतील प्रगतीस अनुकुल

होईल. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात पंचम स्थानी असलेले रवि -बुध या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत गेल्यावर हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व हितशत्रू पराभूत होतील. सुखशांती लाभेल. कर्यसिद्धी होईल. धनलाभ होईल. काहींना कीर्तिलाभ होईल. दोन्ही ग्रह दशम या नोकरीव्यवसायाच्या स्थानास अनुकुल होतील. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्यासोबत गुरु ग्रहही आहे. या सप्तम स्थानी गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो शनिसोबत असून मकर या त्याच्या नीच राशीत आहे. त्यामुळे तो फारसा अनुकुल होणार नाही. त्यामुळे प्रेमसंबंधात अडचणी, अडथळे येणे संभवते. अर्थलाभ होण्यास विलंब होईल. विवाह योग जुळून येण्यात अडचणी येतील. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक आहे. त्यामुळे जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत
मंगळ असून त्याच्यामुळे प्रवासात त्रास व मानहानी होणे संभवते. . येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी मेष या त्याच्या स्वराशीत जात आहे. पण त्यामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. पण या दशम स्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करील. ज्यांना जुगाराचा नाद आहे त्यांनी तो मोह टाळावा. नोकरीत ज्यांना अधिकार पद प्राप्त झाले आहे अशांना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा निर्माण होईल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी " ओम अदितीये नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून तो लाभदायक होईल. काही मंडळींना भूमिलाभ होईल तर काही मंडळींना मानाचे स्थान किंवा प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा

शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल व काही मनोनुकुल घटना घडतील. पण या चतुर्थ स्थानी असलेला रवि ग्रह
व केतु हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून केतूमुळे कोणाशी पटणार नाही. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारकही आहे. रविमुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, संतति समस्या, प्रिय जनांपासून दूरत्व, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशापैकी घटना घडणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात संतती , स्त्रीपासून त्रास होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्यासोबत गुरु ग्रहही आहे. हे दोन्ही ग्रह दशम या नोकरी-व्यवसायाचे स्थानास अनुकुल होतील; पण शनिमुळे शत्रुत्व निर्माण होणे संभवते, गैर समजुती, भांडणे, अनारोग्य होणे संभवते. पण गुरु ग्रहामुळे आरोग्य सुधारेल. काही मंडळींना नोकरचाकरांचे सुख मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे काही मंडळींना उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील. हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय वीज, पाणी यांपासून धोका होणे संभवते. जपा. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. या भाग्यस्थानी मेष राशीत असलेल्या हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. शिवाय त्याच्यामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना नोकरीत अधिकारपद मिळेल. काहींचा सन्मान होईल. तर काही मंडळींना नियोजित कार्यात यश मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगायत्री उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर गायत्रीमंत्राचा बारा वेळा जप करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे धनलाभ होईल. वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना धनलाभ होईल. काही मंडळींना भूमिलाभ, मान

किंवा प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत रवि -बुध - केतु असे तीन ग्रह आहेतच. पैकी रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल' होईल व त्यामुळे आरोग्य उत्तम राहील, नोकरदार मंडळींपैकी काही मंडळींच्या कामावर वरिष्ठ खूष होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, काही मंडळींना मानाचे स्थान, क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यता दिसते. पण बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. केतुमुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. पण या तृतीय स्थानी असलेले रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत गेल्यावर रवि ग्रह प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता अशापैकी घटना त्रस्त करतील. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. पण आर्थिक नुकसान होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्यासोबत गुरु ग्रह पण आहे. येथील शनीमुळे स्वभाव संशयी, स्वार्थी होणे संभवते. पण चिकाटीने प्रयत्न केल्यास बौद्धिक कार्यक्षेत्रात यश मिळू शकेल. त्याला गुरु ग्रहाची अल्पशी साथ मिळेल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. सुखसमाधान लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून या राशीच्या काही जणांना उगीचच एखादी आजारभावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काहींना फसवणुकीचा त्रास होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत मंगळ असून पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतही वाद, भांडणे, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल व त्यामुळे उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीसारखा आजार होणे संभवते. त्याशिवाय हाडमोड होणे, वीजपाणी यांपासून धोका असणे संभवते. याच स्थानी मेष राशीत असलेला हर्षल अपघातकारक आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे प्रवासयोग येतील. पण कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत शुक्र असून तो सुखकारक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र हा राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. धनस्थानी रवि -बुध - केतु आहेतच. पैकी बुद्ध व केतू हे दोन ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असणार असून त्यांच्यामुळे आर्थिक चिंता, शत्रुभय, दु:ख दायक घटना घडण्याची शक्यता आहे. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असेल व त्यामुळे आर्थिक चिंतेसह, वाद, भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. विशेष करून डोळ्याचे दुखणे त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत गेल्यावर अनुकुल होईल व या राशीच्या नोकरदार मंडळींना अधिक सुखकारक व लाभदायक होईल. त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, नोकरीत वरिष्ठ प्रसन्न होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, पगारवाढ, अधिकार पद क्वचित कोणास मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्या सोबत गुरु ग्रहही आहे. येथील शनि प्रतिकुल असून त्याच्यामुळे गृहसौख्यात हानी होणे संभवते. तसेच दु:खदायक घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नैराश्य येईल. पण गुरु ग्रहामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. कौटुंबिक सुख मिळेल; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. ज्यांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होणे आहे ते अपेक्षेनुसार पार पडतील. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय भावनाशील होईल. पण तो अध्यात्म व गूढ संशोधनात रस असणारांना अनुकुल होईल व उपपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगयी करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनात प्रगती होणे शक्य आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारक होईल व त्यामुळे काही मंडळींना उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. पण हा मंगळ वैद्यकीय औषधि संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या स्थानी मेष राशीत हर्षल आहेच. . तोही प्रतिकुल असून त्याच्यामुळे पतिपत्नीत वाद, भांडणे होणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची प्रबळ इच्छा निर्माण होईल. पण त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. घात होईल. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना या राहूमुळे अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. श्रद्धा

असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत जात आहे. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत रवि -बुध -केतू असे तीन ग्रह आहेत. केतु अनुकुल व सुखकारक असला तरी त्याच्यापासून वाहनधोका आहे. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. पण रवि - बुध हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता, भांडणे होणे संभवते. बुधामुळे मित्रद्रोह, धननाश, कुसंगती यांचा त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यासोबत गुरु ग्रहही आहे. या शनिमुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळेल तर काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. गुरु ग्रहामुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल. वैचारिक लेखनास गुरु-शनि हे दोन्ही ग्रह अनुकुल असून त्यांच्यामुळे या राशीच्या काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत घोटाळे, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे संततीपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेल. पण हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व औषधी संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ ग्रह या स्थानी येत आहे. हे दोन्ही ग्रह अनारोग्यकारक होणार असून काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. या राशीच्या शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी त्यांनी सतत फार खोल विचार करू नये. डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनात कपटी विचार येतील. काही मंडळींना वाम मार्ग धन मिळविण्याची तीव्र ओढ निर्माण होईल. शिवाय तो वैवाहिक

जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी " ओम इंद्राय नमः " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या लाभस्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व सुखसमाधान लाभेल. हा शुक्र या महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या व्ययस्थानी रवि - बुध -केतु हे तीन ग्रह आहेतच. या स्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव चंचल, लहरी होईल. पण रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, चिंताभय, नैराश्य, आर्थिक चिंता, अस्वस्थ मन, धननाश, मित्रद्रोह, कुसंगती, अपयश, मानहानी अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. पण येथील शनि प्रतिकुल होणार असून त्याच्या सोबत असलेला गुरु हा नीच राशीत असल्यामुळे तो फारसा अनुकुल होणार नाही. त्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. आर्थिक संकटे त्रस्त करतील. कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु ग्रहामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती भावनाशील होईल. शिवाय तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्याची ओढ असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत असलेला मंगळ भांडणतंटे, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. हा मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत जात असून तेथे हर्षलही आहेच. हा हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मन धूर्त, कावेबाज होईल, हितशत्रूवर विजय मिळेल. अन्य जातिधर्माच्या मित्रांपासून लाभ होईल. पण हा राहू विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे

त्यांनी “ओम उदकाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करावे. तेच सुखाचे होईल. या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्या सोबत गुरु ग्रह पण आहे. पण येथील शनि प्रतिकुल असून त्याच्यामुळे स्वतः:चे आणि जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी अशापैकी कारणांमुळे नैराश्य येणे संभवते. पण गुरु ग्रहामुळे आरोग्य उत्तम राहील. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना हा गुरु काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे हिंमत, म्हत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल . पण त्याच्यामुळे इजा होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी जात असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल हा विक्षिप्त स्वभावाचा ग्रह आहेच. त्याच्यामुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या लाभस्थानी जात आहे. त्यामळे तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे
सुखसमाधान लाभेल. धनलाभ होईल. मन:शांती लाभेल. या लाभस्थानी वृश्चिक राशीत रवि -बुध -केतू असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल. आरोग्य चांगले राहील. नोकरदार मंडळींना बढती, अधिकार पद, क्वचित कोणास मानाचे उच्च स्थान मिळणेही संभवते. बुधामुळे मित्रलाभ, धनलाभ व सुखसमाधान लाभेल. केतूही अनुकुल व सुखकारक होईल. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर
प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. आर्थिक चिंता त्रस्त करतील. मानहानी होईल. हाती घेतलेल्या कामात अपयश येईल. त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी

स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा “चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी मेष या स्वराशीत जात असून तो अनुकुल होईल. त्याच्यामुळे हिंमत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल आहेच. तो उच्च बौद्धिक शक्ती,
स्मरणशक्ती व आकलनशक्ती देणारा आहे. त्यामुळे तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. कुटुंबात अनिष्ट घटना घडतील. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा यास्वराशीत शुक्र असून काही मंडळींना गुरुकृपा तर काही मंडळींना थोरकृपा प्राप्त होईल. सुखसमाधान, मन:शांती लाभेल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत रवि -बुध -केतू असे तीन ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात भाग्यस्थानी असलेला शुक्र या राशीच्या दशम स्थानी जात आहे. त्यामुळे महिन्याचा अखेरचा सप्ताह या राशीच्या स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना व्यवसायात अडचणी, अडथळे सहन करावे लागतील. पण रवि-बुध हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व लाभदायक होतील. त्यांच्यामुळे सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत बढती, पगारवाढ, अधिकारपद, प्राप्त होईल. मोठ्या ओळखी होतील. क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही संभवते. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण केतूमुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. नुकसान होईल. या राशीच्या व्यय स्थानी मकर या स्वराशीत शनि व सोबत गुरु पण आहे. येथील शनि प्रतिकुल असून या राशीच्या मंडळींनी सर्व आर्थिक व्यवहार जपून , विचारपूर्वक व सावधानतेनेच करावेत. मानहानी होणे संभवते. शिवाय अनारोग्य होणेही

संभवते. पण येथील गुरु अध्यातम, सामाजिक कार्य यांची आवड असणारांना अनुकुल व यशदायक होईल. पण या गुरूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. प्रवासात त्रास होण्याची शक्यता आहे. श्रद्‌धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा “चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारकाआहे त्यांनी “ओम वरुणाय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः “ मंत्राचा मनापासून श्रद्‌धेने १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव अतिशय संतापी, हट्‌टी, अहंकारी, मानापमान फार असणारा, जिद्‌द करणारा असा घडला जाण्याची शक्यता वाटते. त्यामुळे अकारण श्रम, दगदग व शरीरपीडा होत असली पाहिजे. सर्व नोकरदार मंडळींना हा मंगळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या धनस्थानी मेष या स्वराशीत जात आहे. तेथे हर्षल हा विक्षिप्त ग्रह आहेच. त्यामुळे मनस्थिती अस्थिर होऊन अविचारी आचरण होत असेल. तसेच आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत असेल. शिवाय अविचाराचे आचरण होणेही संभवते. मंगळामुळे अनारोग्य व आर्थिक चिंता होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल व हरहुन्नरी होईल. हातून कर्तृत्व घडेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. . या राशीच्या अष्टम स्थानी तुळा या स्वराशीत शुक्र असून काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण वृद्‌ध मंडळींना हा शुक्र प्रतिकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत रवि-बुध - केतू असून या केतूमुळे या राशीच्या काही मंडळींकडून ढोंगी आचरण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येईल. रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होतील. त्यांच्यामुळे महिन्याचा उत्तरार्ध सर्व प्रकारे सुखसमाधानकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार नाहीत. शनीमुळे धनलाभ होईल पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. गुरूमुळे विवाहेच्छूना विवाहयोग येईल. शिक्षणात प्रगती होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. या राशीच्या व्ययस्थानी नेपच्यून असून त्याच्यामुळे नैराश्य

येईल. चिंता त्रस्त करतील. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्‌धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्‌धेने १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====